सस्नेह निमंत्रण





# प. पू. सद्गुरू समर्थ अण्णा महाराज

यांचा ७५ वा म्हणजेच

# अमृतमहोत्सवी वाढदिवस सोहळा

त्या प्रित्यर्थ

## धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य अशा कार्यक्रमांचे आयोजन

बुधवार, दि. ११ मार्च २०२० ते शनिवार दि. १४ मार्च २०२०

स्थळ : प.पू. राऊळ महाराज समाधी मंदिर, पिंगुळी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग



## माझ्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून......

**दैवयोगे जन्मलो मी राऊळ कुळी । राऊळ महाराज लाभली मज गुरूमाऊली ।**
**त्यांनीच केला पिंगुळीचा कायाकल्प । झालो मी निमित्त, जन्म झाला सार्थक ।**
**उतलो नाही मातलो नाही । घेतला वसा टाकला नाही ।**
**कितीही आली संकटे तरी । पाय मागे घेतला नाही ।**
**गुरूकार्याची धरूनि कास । गुरूनामाचा अखंड ध्यास ।**
**राऊळचरणांचा आहे मी दास । जोवर आहे अखेरचा श्वास । जोवर आहे अखेरचा श्वास ।।**

मी, विनायक अण्णा राऊळ, म्हणजे तुम्हा सर्वांचा झाडूवाला. एक गुरांचा राखणा. परमपूज्य सद्गुरू श्रीसमर्थ राऊळ महाराज हे माझे सद्गुरू. लौकिक नात्याने माझे काका असलेल्या या ब्रम्हज्ञानी अवलिया सत्पुरूषाची शक्ती आणि त्यांचे त्रिकालज्ञान मी त्यांच्या प्रत्यक्ष सहवासात जवळजवळ २५ वर्षे अनुभवले आणि ते समाधीस्थ झाल्यानंतरही गेली ३५ वर्षे मी पदोपदी त्याची प्रचिती घेतो आहे. त्यांनीच मला आकार देऊन घडवले आणि त्यांना अपेक्षित असलेले कार्य माझ्याकडून साकार करून घेतले. श्रीराऊळबाबांची माझ्यावर गुरूकृपा झाली आणि बघता बघता गेल्या ६० वर्षाच्या म्हणजे संपूर्ण ५ तपांच्या गुरूसेवेतून त्यांनी माझ्याकडून प्रचंड गुरूकार्य आणि समाजकार्य करवून घेतले. आज माझ्या वयाच्या ७५व्या वर्षी मी कृतकृत्य आहे, कृतार्थ आहे. माझा जन्म सफल झाल्याची भावना माझ्या संपूर्ण देहमनाला व्यापून राहिली आहे. येत्या १३ मार्च २०२० रोजी माझ्या वयाला ७५ वर्षे व माझ्या गुरूसेवेला ६० वर्षे पूर्ण होत असताना माझा हा **गुरूसेवा-व्रताचा** प्रवास आपणांपर्यंत पोहोचावा अशी माझी मनापासूनची इच्छा आहे. जेणेकरून, प्रपंच आणि परमार्थ तसेच अध्यात्म आणि दैनंदिन जीवन ही एकाच रथाची दोन चाके आहेत आणि अथक गुरूसेवेने आणि त्यातून प्राप्त झालेल्या गुरूकृपेने सामान्य संसारी मनुष्यही या रथावर आरूढ होऊ शकतो, याचे ज्ञान जनमानसांपर्यंत पोहोचेल. मला सर्वांना कळकळीने हेच सांगायचे आहे की - 'गुरूसेवेच्या माध्यमातून गुरूकृपा नक्की प्राप्त होऊ शकते आणि एकदा का गुरूकृपा झाली तर काहीच अशक्य नाही.' हा अनुभव मी स्वतः घेतलेला आहे.

माझा जन्म मंगळवार, दिनांक १३ मार्च १९४५ रोजी पिंगुळी गांवात झाला. माझ्या आईचे नांव सौ.सरस्वती दत्ताराम राऊळ व वडिलांचे नांव श्री.दत्तारामबाबा आप्पाजी राऊळ. राऊळ घराणे हे पिंगुळी गांवचे ग्रामदैवत श्रीदेव रवळनाथ यांचे सेवेकरी, मानकरी व पुजारी. शेती हाच आमच्या कुटुंबाचा मुख्य व्यवसाय. त्या काळात आमच्या घरची आर्थिक परिस्थिती खूप गरिबीची होती. माझ्या आई-वडिलांनी अपार कष्ट करून कुटुंबाचा गाडा चालवला आणि सर्वांना एकत्र आणि सुखी ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आम्हा सर्व भावंडांवर खूप चांगले संस्कार बिंबवले. परिस्थिती नसतानासुध्दा आम्हा मुलांना शाळेत घातले. मला मात्र शाळेची अजिबात आवड नव्हती. माझी फक्त १७ दिवस शाळेत हजेरी लागली. मी शाळेत जात नाही म्हटल्यावर वडिलांनी मला गुरे राखण्याचे काम दिले. त्यावेळी माझे वय अवघे ८/९ वर्षाचे.

परंतु मला आवड असल्यामुळे मी सगळया गुरांची सर्व प्रकारची निगा राखत असे. त्या मुक्या प्राण्यांवर मी खूप प्रेम करायचो. त्यांचे पोट भरले की मला खूप बरे वाटायचे. मुक्या प्राण्यांच्या आशीर्वादाचे खूप पुण्य मला लाभले. ६/७ वर्षे गुरांचा राखणा म्हणून मी मनापासून गोसेवा केली. त्या काळात पैसा आमच्या दृष्टीसही पडत नसे. मला ना शिक्षण ना नोकरी. घरात १८ विश्वे दारिद्रय. खायला पोटभर अन्न नसायचे. अंगावर कपडा नसायचा. माझ्या वयाच्या १२ वर्षापर्यंत मी काष्टी नेसून दिवस काढले. नंतर मला १ आण्याला एक चड्डी अशा २ चड्डया बाबांनी घेतल्या. जरी मी गुरे राखण्यासाठी डोंगरातून, दगडधोंडयातून, काटयाकुटक्यातून जात होतो, तरी माझ्या पायात चप्पल नसायचे. कारण एक आण्याची चप्पल घेण्याएवढेसुध्दा पैसे माझ्या वडिलांकडे नव्हते. राऊळ कुटुंबच एवढे मोठे होते की सर्वांच्या गरजा पूर्ण करणे शक्यच नव्हते.

खरं म्हणजे श्रीराऊळबाबा हे कुटुंबाचे प्रमुख. पण त्यांची ओढ प्रपंचाकडे नसून ईश्वरभक्तीकडे होती. त्यामुळे ते घरात काहीच बघत नसत. म्हणूनच त्यांच्या आईने म्हणजे माझ्या आजीने संपूर्ण राऊळ कुटुंबाची जबाबदारी माझे वडील दत्तारामबाबा यांच्यावरच सोपवली होती. परंतु घरात कोणीच नोकरीला नव्हते. त्यामुळे उत्पन्नाचे साधन म्हणून राऊळबाबांच्या आईने चहाचे छोटेसे हॉटेल सुरू केले. सुरूवातीला काही दिवस ते तिने स्वतः चालवले व नंतर श्रीराऊळबाबांचे बंधू शंभाकाकास चालवण्यास सांगितले. परंतु शंभाकाका मधुमेहाने अतिशय आजारी पडल्यामुळे व अजुन कोणीच दुकान चालवण्यास तयार न झाल्याने शेवटी १९६० साली दुकानाची जबाबदारी दत्तारामबाबांनी माझ्यावर सोपवली. १९६० सालापासून राऊळ महाराजांच्या आईच्या दुकानामध्ये मी कामाला राहिलो. त्या वेळी माझे वय १५ वर्षाचे होते. वय लहान, त्यात शिक्षण नाही. त्यामुळे व्यवहार कसा करायचा, याचं ज्ञान मला नव्हते. पण मी धीर सोडला नाही. राऊळबाबांच्या आईचं दुकान ते ! त्या दुकानाची काळजी त्यांनाच ! मला आवड असल्यामुळे मी मन लावून काम करायला लागलो आणि थोडया दिवसांतच माझा चांगला जम बसला. राऊळबाबांच्या कृपेमुळे मी सर्व व्यवहारात हुशार झालो. मला पैशाचा हिशोबही येऊ लागला. त्या वेळी दिवसाला जेमतेम २/३ रूपये उत्पन्न येत असे. माझा सर्व वेळ दुकानातच जात असे. सकाळपासून रात्रीपर्यंत मी दुकानातच असायचो. दुकानातच झोपायचो. राऊळबाबांची मला आज्ञाच होती की मी दुकानात झोपावे. इथुनच माझ्याही नकळतपणे माझ्या गुरूसेवेला सुरूवात झाली.

## माझ्या गुरूसेवेची सुरूवात

या दुकानाला लागूनच एक लहानशी खोली होती, जिथे राऊळ महाराज ग्रंथवाचन करत असत, एकतारी वाजवत असत, ध्यानाला बसत असत. हीच ती लहानशी खोली, ज्या ठिकाणी आज प.पू.राऊळबाबांचं भव्य आणि जागृत असं समाधी मंदिर उभं आहे. राऊळबाबा नेहमी भ्रमंतीवर असत. पण पिंगुळीत आले की ते आपल्या या खोलीत बसत. मग मी त्यांच्यासाठी चहा, लाडू घेऊन त्यांच्या खोलीत जात असे. मी बाबांची खोली झाडत असे.

त्यांना काय हवं नको ते बघत असे. १९६० ते १९७२ अशी १२ वर्षे रात्रं-दिवस राऊळबाबांची सेवा माझ्याकडून होत होती. राऊळ महाराज अनेक वेळा पेटया, मृदुंग, तबला, वीणा, चिपळया, इत्यादि वस्तू या खोलीत आणत असत. मला खूप मजा येत असे कारण मला त्याची अतिशय आवड होती. रात्री ९ वाजले की राऊळबाबा म्हणत - ''विन्या, इकडे ये. एकतारी वाजव.'' मी म्हणायचो - ''आबा, मला नाही येणार वाजवायला.'' मग ते मला वाजवून दाखवत व म्हणत ''अरे बघ. अशी वाजव.'' मध्येच ते सांगत, ''विन्या, टाळ वाजव.'' ''पेटी वाजव.'' त्यांच्या सांगण्याप्रमाणे या गोष्टी करत गेल्यावर मी या सर्वामध्ये पारंगत झालो. रात्री भजन आणि सकाळी दुकान हे मी अखंडपणे न थकता करू शकलो कारण बाबांची शक्ती त्यामागे होती. राऊळबाबा कधी म्हणत, ''विन्या, हे पुस्तक वाच.'' मी त्यांना म्हणायचो - ''आबा, मला वाचता येत नाही.'' त्यावर ते मला म्हणायचे - ''काय नाय. येताला, येताला.'' बाबांच्या या शब्दांवर पूर्ण विश्वास ठेवूनच हळुहळू मी लिहायला व वाचायला शिकलो.

भक्ती, कर्म आणि ज्ञानमार्गाचे गुह्य जाणत असलेले राऊळ महाराज, अनेक दिवस अखंड ध्यानधारणा करून आत्मानंदी रंगून जात असत. त्यांच्यासाठी आपल्या आईचे स्थान गुरूपेक्षाही मोठे होते. म्हणूनच आपल्या आईच्या दुकानाला लागून असलेल्या लहानशा खोलीतच ते ध्यानधारणा करत. श्रीराऊळ महाराज खिडक्या-दरवाजा बंद करून अन्न-पाण्याशिवाय ४०/४५ दिवस ध्यानाला बसत. या दिवसांत खाणे, पिणे, बोलणे काहीही नाही. कितीही हाका मारा किंवा ढोल-ताशे वाजवा, त्यांना त्याचे काहीच नसे. त्यांच्या ध्यानाची ही पध्दत मी दुकानात काम करायला लागल्यापासून हळुहळू माझ्या लक्षात यायला लागली. त्यांचे ध्यान सुरू झाल्यापासून पहिल्या काही दिवसापर्यंत मी रात्री दुकानातच पण निवांत झोपायचो. त्यानंतर मात्र १०/१२ दिवस, 'त्यांची हाक ऐकू येईल की काय' या विचाराने मी संपूर्ण दिवस सतर्क रहात असे. दुकानात एका बाजुला काम सुरू असले तरी माझे कान मात्र राऊळबाबांच्या हाकेकडे लागलेले असत. रात्रीही मी झोपत नसे. कारण त्यांनी हाक मारली तर त्यांचा आवाज खूपच हळू ऐकू येत असे. त्यामुळे मला कानात प्राण आणून लक्ष द्यावे लागे. ध्यान संपले की ते हळू आवाजात, ''अरे विन्या, अरे विन्या'' अशी हाक मारायचे. अशाप्रकारे दुकान सांभाळून कुटुंबाची जबाबदारी पेलवतानाच परमपूज्य राऊळबाबांची सेवा माझ्याकडून अखंडपणे होत होती. हे सर्व मनोभावे, कसलीही अपेक्षा न करता माझ्याकडून घडत गेले. **'माझी देवपूजा, पाय तुझे गुरूराया। गुरूचरणांचे ध्यान, हेच माझे गंगास्नान ।।'** ही माझी अखंड श्रध्दा असल्यामुळे श्रीदेव रवळनाथ आणि माझे सद्गुरू परमपूज्य श्रीसमर्थ राऊळ महाराज यांची माझ्यावर कृपा झाली.

१९६० सालापासून आमच्या घराकडूनच दुकानात जेवण यायचे. पण खरं सांगायचं तर, तेही कधी मला वेळेवर जेवता यायचं नाही. १९७० पासून राऊळबाबांकडे येणारी माणसे वाढली. अशा वेळी कुठलीही तक्रार न करता, आमची परिस्थिती नसतानाही घराकडून थोडे तांदूळ आणि कुळीथ आणून मी स्वतः रात्री-बेरात्री दुकानात जेवण करून सर्वांना वाढत

असे. १९६४ सालामध्ये राऊळबाबांना विचारून मी भुसारी दुकान सुरू केले. त्यानंतर आर्थिक परिस्थिती थोडी सुधारली. त्यामुळे मी तांदूळ, डाळ, बटाटे, नारळ बाहेरून विकत घेऊन बाबांच्या भक्तांना जेवण करून वाढू लागलो. मला कोणी एक रूपयासुध्दा देत नसे. मीही कोणाकडे काहीही मागत नसे. जेवणानंतरची भांडीसुध्दा मीच घासायचो. भक्तांच्या झोपण्याची व्यवस्था करणे, त्यांचे सामान उचलणे अशी सर्व कामे मी करायचो. सर्व ठिकाणी माझे लक्ष असायचे. रात्रभर पहारा ठेवायचो. त्यामुळे तेव्हा माझी जी झोप गेली ती कायमचीच. आताही पिंगुळी स्थानी मी ही रखवालदारी करतोच आहे. खूप कष्ट केले. खूप हमाली केली. माझ्या या कष्टांची कोणा भक्ताला कदरसुध्दा नव्हती. परंतु मी कुठल्याही आशेने काही करत नव्हतो. सर्व काही राऊळबाबाच करून घेत होते. अनेक वेळा मला स्वतःला उपाशी रहावे लागे. तरीही मी न थकता, आनंदाने ही सेवा करत असे. मुख्य म्हणजे, हे सर्व माझे दुकानातील काम करून मी करत असे. कुठून यायची एवढी शक्ती? प.पू.राऊळबाबांनीच मला घडवताना माझ्या देहाच्या माध्यमातून स्वतःची दिव्य शक्ती वापरून हे सर्व करून घेतले.

राऊळ महाराज मला झोपूही देत नसत. पण मी कधी कंटाळा केला नाही. मी गुरूआज्ञा कधीच मोडली नाही. ते जे जे सांगत ते ते करत राहिलो. १९७० साली त्यांच्याच आशीर्वादाने मी गांवचा सरपंच झालो. निःस्वार्थ बुध्दीने केलेल्या लोकोपयोगी कार्यामुळे गांवाने मला अनेक मान–सन्मान दिले. मला भजनाची खूपच आवड होती. राऊळबाबांच्या कृपेमुळे मी भजनीबुवाही झालो. मी हे सर्व माझा व्यवसाय, राऊळ कुटुंब आणि राऊळबाबांच्या भक्तांची उठाबस करून करत होतो. कितीही कष्ट पडले तरी मागे हटलो नाही. कष्ट करतच राहिलो. १९६० सालीच फारसे काही माहित नसताना मी प.पू.राऊळबाबांची पहिली गुरूपौर्णिमा साजरी केली. त्यानंतर पिंगुळी स्थानी बाबांचे अनेक कार्यक्रम, कीर्तने, भजने केली. कोणालाही त्रास दिला नाही. कोणाकडे पैसेही मागितले नाही. अनेक प्रकारचे व्यवसाय करून जे पैसे येत होते त्यातून मी हे करायचो. माझी सत्वपरीक्षा बघताना, कधी कधी राऊळबाबा दुकानातील सर्व काही वाटून टाकायचे किंवा रस्त्यावर, विहिरीत टाकून द्यायचे. पण माझ्या मनात कधीही किल्मिषही येत नसे किंवा मला कधीही त्याची खंत वाटली नाही. जे बाबा ४०/४५ दिवस अन्नपाण्यावाचून, लाईट–पंख्याशिवाय बंद खोलीत ध्यानासाठी राहू शकतात; त्यांच्या शक्तीची मला जाणीव होती. त्यामुळे ते काय करतात ते आपण सहन केले पाहिजे, असा ठाम विचार मी करत असे. ते जे घेत होते त्याच्या दुप्पट तेच देत होते. त्यामुळे मी फक्त त्यांच्या आज्ञा पाळत गेलो. मला कधीच काही कमी पडले नाही आणि मीही त्यांच्या गुरूसेवेत कधीच कमी पडलो नाही. म्हणूनच अशी सेवा घडत असताना **१९७२ सालातील गुरूद्वादशीच्या दिवशी पहाटेच्या वेळी दिगंबर अवस्थेमध्ये असलेल्या माझ्या सद्‌गुरू राऊळबाबांनी मला गुरूमंत्र देऊन अध्यात्मिकदृष्ट्या सालंकृत केले.** त्या वेळी त्यांच्या मुखातून एक भविष्यवाणी प्रसवली –''विन्या, आता हे सगळं तुलाच सांभाळायला पाहिजे.'' मी त्यावेळी २७ वर्षांचा होतो. मला त्यावेळी त्यातलं काहीच समजलं नाही. कालांतराने मात्र राऊळबाबांनी सांगितलेल्या सर्वच गोष्टींचा अर्थ मला उलगडत गेला. १९७२ सालानंतर

राऊळबाबा कधीही ध्यानाला बसले नाहीत. १९७२ ते १९८४ ही १२ वर्षे त्यांची संपूर्ण भ्रमंती सुरू होती.

श्री राऊळबाबांनीच त्यांच्या कृपा–आशीर्वादाने मला सिध्द करून घेतले. जेव्हा त्यांच्या दृष्टीने मी पूर्णसिध्द झालो; तेव्हा त्यांनी १९८४ साली इतर लोकांनाही त्याची जाणीव करून दिली. १९८४ सालातील दत्तजयंती श्रीराऊळबाबांनी त्यांच्या आईच्या दुकानामध्ये साजरी केली. त्या दिवशी सकाळी ८ वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत प.पू.राऊळबाबांनी मला त्यांच्या शेजारी धक्क्यावर बसवून घेतले व तेथे उपस्थित सर्व भक्तांना ते म्हणाले, ''तुमी विन्याक नमस्कार करा आणि हार व भेटवस्तू जे जे मला द्यायला आणलं आहे ते सर्व विन्याक घाला.'' त्यांनी स्वतःला हारसुध्दा घालून घेतला नाही. एवढेच नाही तर स्वतःच्या उपस्थितीत त्यांनी सर्वांना मला नमस्कार करायला सांगितला. हा त्यांच्या गुरूकृपेचा दृष्य आविष्कार होता. त्यानंतर त्यांना त्यांच्याबरोबर मला गाणगापूरला घेऊन जाण्याची इच्छा होती. त्या दिवशी त्यांनी ३ वेळा त्यांच्या आईच्या दुकानाकडे गाडी लावली व म्हणाले, ''विन्या चल. आपण गाणगापुराक जाऊया.'' पण गाडीत जागा नव्हती व तीन्ही वेळा माझ्यासाठी कोणीही खाली उतरले नाही. चौथ्या वेळी ते पुन्हा गाडी घेऊन दुकानाकडे आले. त्यांनी आपला मुलगा दाजी याला हाक मारून बोलावले व ते मोठयाने म्हणाले की, ''दाजी, आजपासून दुकान तुज्या ताब्यात. विनो आजपासून दुकानात नाय.'' आणि ते सरळ गाणगापूरला निघून गेले. पण बघा! **राऊळबाबा जरी मला गाणगापूरला घेऊन जाऊ शकले नाहीत तरी त्यांनी माझ्यासाठी आणि अखंड मानवजातीसाठी प्रति गाणगापूर अशी पिंगुळी 'मला निमित्त करून ' निर्माण करून घेतली.**

१९६० ते १९८४ अशी दोन तपे मी ते दुकान चालवले होते. तसेच त्यावेळी श्रीराऊळबाबांच्या कृपेने ते दुकान सर्व आवश्यक मालाने भरलेले होते. तरीही कुठलाही मागचा पुढचा विचार न करता, गुरूआज्ञेनुसार, मी भरभराटीला आलेले ते दुकान एका सेकंदाचाही विचार न करता त्याच क्षणी सोडले. या सर्व गोष्टींचा अर्थ फार गहन होता. पण तो मला त्या वेळी समजत नव्हता. नियतीने माझे काय विधिलिखित लिहून ठेवले होते, ते त्यावेळी कोणालाही कळणे कठिण होते! परंतु माझ्यासाठी ती गुरूआज्ञा होती. मी ताबडतोब दुकानाची चावी दाजीच्या हातात दिली आणि दुकानाच्या जबाबदारीतून मुक्त झालो. बायको, मुले, संसार काही पाहिले नाही. त्या वेळी दुकानात येणारी गांवातील काही वयस्कर जाणकार मंडळी दुकानात यायची ती मला समजवायची. पण मी त्या सर्वांना ठामपणे सांगायचो, ''तुम्ही मला कोणीही काहीही सांगू नका. गुरूआज्ञा म्हणजे गुरूआज्ञा! मी दुकानात पाऊल ठेवणार नाही.'' श्रीराऊळबाबांच्या आज्ञेनुसार आजपर्यंत मी त्या दुकानात पाय ठेवला नाही. मी कायम धक्क्यावर बसायचो. १९८४ पासून आजपर्यंत मी दुकानातून एक रूपयासुध्दा घेतला नाही. उलट मी पैसे देऊन दुकानातून वस्तू विकत घेत असतो.

डिसेंबर १९८४च्या अखेरीस राऊळबाबांच्या सांगण्याप्रमाणे मी कायमचे दुकान सोडले आणि त्यानंतर एका महिन्यातच परमपूज्य श्रीराऊळ महाराजांनी ३१ जानेवारी १९८५ रोजी

गुरूवार, माघ शुध्द दशमी या दिवशी देह ठेवला. त्यांनी पूर्वी अनेक वेळा माझ्याकडे व्यक्त केलेल्या इच्छेनुसार, ते 'गाणगापूरचा दत्त' असे संबोधत असलेल्या त्यांच्या लाडक्या औदुंबराकडे व माऊलीकडे पुढा करून द्वादशीच्या दिवशी त्यांना समाधीस्थ करण्यात आले. त्या समाधीमध्ये आसनस्थ होऊन ते आपल्या भक्तांना कायम आशीर्वाद देत आहेत. प.पू.राऊळ महाराजांनी देह ठेवल्यानंतर ५ महिन्यांनी एका रात्री मी दुकानात झोपलेलो असताना मला राऊळबाबांच्या समाधीजवळून बाबांचे स्पष्ट शब्द ऐकायला आले – ''विन्या विन्या, तू वाट कोणाची बघतोस? मी हय समाधीत बसलंय ते कशाक? तू काम सुरू कर.'' ती राऊळ महाराजांची दृष्टांतातील आज्ञा होती. त्यानंतर मी मागचा पुढचा कसलाही विचार न करता, आणि इतर कोणाचाही विचार न घेता दुकान व बाबांची खोली संपूर्ण पाडून टाकली आणि बाबांच्या समाधी मंदिराच्या बांधकामाला सुरूवात केली. माझ्या गुरूबंधू–भगिनींनो, गुरूंच्या त्या वचनावर पूर्ण विश्वास ठेवून माझ्याकडे एक रूपयाही नसताना मी राऊळबाबांच्या समाधीमंदिराच्या कामाला लागलो. बघता बघता एका वर्षाच्या आत अतिशय सुबक अशा समाधीमंदिराचे काम पूर्ण झाले. गुरूंवर पूर्ण निष्ठा असावी लागते. मग गुरू पैसा नसतानाही कसे काय सर्व करून घेतात याचेच हे उदाहरण आहे. ''शाळेत न गेल्यामुळे ज्याला सही करता येत नाही, जो गुरांचा राखणा; तो काय मंदिर बांधणार?'' असे त्या वेळचे काही लोक म्हणत असत. पण कोण काय करू शकतो हे गुरूंनी दाखवून दिले. गुरूंनीच पुढचा मार्ग दाखवला. त्यांनी मला दुकानातून बाहेर काढले नसते, तर मी पैसेच कमावत राहिलो असतो. राऊळबाबांना माझ्याकडून त्यांचे स्वप्न पूर्ण करून घ्यायचे होते. म्हणून त्यांनी मला दुकानातून काढले. त्यांच्या कृपेने आजपर्यंत मला काहीच कमी पडले नाही. मी ज्या गोष्टीमध्ये हात घालतो ती गोष्ट बाबा माझ्याकडून पूर्ण करून घेतात.

श्रीराऊळबाबा आधीपासूनच मला काही लोकांची नांवे घेऊन सांगायचे की, ''यांचे कोणाचेच पैसे आपल्याला नको. ते विष आहे.'' आज बाबांनी देह ठेवून ३५ वर्षे झाली, मी बाबांच्या कुठल्याच भक्ताकडे पैसे मागायला गेलो नाही. आता जी बांधकामे झाली आहेत ती बाबांना न बघितलेल्या भक्तांना बुध्दी देऊन बाबांनी माझ्या माध्यमातून करून घेतली आहेत. कोणीही न सांगता, मी स्वतः निर्णय घेऊन 'श्री.प.पू.स.स.राऊळ महाराज सेवा ट्रस्ट' हा ट्रस्ट स्थापन केला. ९० माणसांचे कुटुंब असूनसुध्दा कुटुंबासाठी मी काहीही ठेवलेले नाही. आजपर्यंत लोकांनी अर्पण केलेल्या निधीच्या या ट्रस्टच्या नांवे पावत्या करत आहे. मी स्वार्थी असतो तर गुरूंची कृपा झाली नसती. बाबांना जे जे जसे जसे हवे; तसे ते त्यांनी माझ्याकडून पूर्ण करून घेतले. त्यांचे तेच करवून घेत आहेत. एवढी मंदिरे झाली पण मी कधीही मुहूर्त पाहिला नाही. माझे गुरू राऊळ महाराज यांचे नांव हाच माझा मुहूर्त!! मी मोठमोठे १७ यज्ञ केले. २ अतिरूद्र स्वाहाकार केले. पण त्या यज्ञांसाठीही मी कधी मुहूर्त बघितला नाही. कधी पैशासाठी मी पावतीपुस्तके घेऊन घरोघरी गेलो नाही. अनेक मोठमोठे कार्यक्रम केले. त्यासाठीसुध्दा कुडाळ, मालवण, वेंगुर्ले, सावंतवाडी, कणकवली येथून तांदूळ, तेल, डाळ, साखर, बटाटा, रवा असे काहीही मागण्यासाठी गेलो नाही. जे सामान मागवायचो, त्याच्या बिलाचे पैसे लगेच भरून टाकायचो.

गुरूकृपेचा महिमा मी किती सांगू! कितीही वर्णन केले तरी कमीच आहे. ज्याच्याकडे शिक्षण नाही, जो गुरांचा राखणा आहे; त्याला गुरूकृपेने सर्व कसे मिळाले, तेच मी आज माझ्या ७५व्या वाढदिवसाचे आणि ६० वर्षाच्या अखंड गुरूसेवेचे औचित्य साधून तुम्हाला सांगत आहे. राऊळबाबा १९८५ साली समाधीस्थ झाल्यानंतर गेल्या ३५ वर्षांमध्ये त्यांनी माझ्याकडून जे उभे करून घेतले आहे ते या गुरूकृपेची साक्ष आहे. राऊळबाबांशिवाय मला दुसरा विचार आणि दुसरे जीवनच नाही. **गेली ६० वर्षे म्हणजे पूर्ण ५ तपे मी पिंगुळी या एका स्थानी राहून गुरूसेवा करत आहे. एका स्थानी राहून एवढी प्रदीर्घ सेवा करणारा माझ्या माहितीत कोणी नाही. पण हा माझा मोठेपणा नाही. ही माझ्या सद्‌गुरू राऊळबाबांची व माझ्या आई-वडिलांच्या आशीर्वादाची कृपा आहे.** त्यांची पुण्याई फळाला आली म्हणून माझे आयुष्य हे चांगल्या कार्यासाठी कामी आले. १९८४नंतर आजपर्यंत मी माझ्या घरी कधीही झोपायला गेलो नाही. माझे दिवस आणि रात्र हे बाबांच्या स्थानातच गेले. १९६० ते २०२० या ६० वर्षांच्या काळात त्यांनीच माझ्याकडून देह-मन अखंड झिजवून सर्व करून घेतले. राऊळबाबांनी मला पैसा, सोने, चांदी, बंगला हे काही दिले नाही. पण गुरूकृपेने त्यांनी मला जे दिले ते अक्षय आहे...शाश्वत आहे. श्रीसमर्थ राऊळबाबांनी आपले शब्द खरे केले. ते मला कायम सांगत की, ''विन्या, अन्न वाढ'' ''चहा दे'' ''लाडू दे'' ''कपडे दे'' ''भुकेलेल्या गरजूंना मदत कर.'' ''शाळांना मदत कर.'' ''अन्नदान कर.'' त्यांच्याच आज्ञेने आजतागायत पिंगुळीमध्ये सर्वांसाठी रोज विनामूल्य अन्नदान सुरू आहे. उत्सवात तर लाखो लोक राऊळ महाराजांच्या महाप्रसादाचा लाभ घेतात. गेल्या अनेक वर्षात अनेकांना शेतीसाठी मदत केली. असंख्य गोर गरीबांना मदत केली. अनेक विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, वहया-पुस्तके वाटली. अनेक आजारी माणसांना आर्थिक मदत केली आणि हे आजपर्यंत सुरूच आहे. **समर्थ रामदासांनी दासबोधामध्ये म्हटलेच आहे - 'शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यासी यावे । उणे पडो न द्यावे । कोणा एकासि ।।' माझ्या या अमृतमहोत्सवी वर्षाप्रित्यर्थ माझ्या ट्रस्टतर्फे आणि भक्तांतर्फे जे जे उपक्रम राबवले गेले ते सर्व माझ्या आयुष्यभराच्या अध्यात्मिक आणि सामाजिक सेवेचे प्रतिबिंबच आहे.** सिंधुदुर्ग जिल्हयातील आठही तालुक्यांमधील अपंग, आंधळया-पांगळया तसेच अनाथ गरजूंच्या विविध संस्थांना जीवनावश्यक अन्नधान्याचे वाटपही करण्यात आले. हे सर्व मी करत नाही. हे सर्व गुरूकृपेने घडले आणि घडत आहे. राऊळ महाराज भक्तांना बुध्दी देतात व ते भक्त मला देतात. त्याच्यातूनच मी केवळ निमित्तमात्र होऊन सर्व करत असतो. गुरूंची कृपा झाली, त्यांची मर्जी झाली की सर्व कार्य होऊन जाते, याचे हे उदाहरण. 'कृष्ण' नांव असलेल्या श्रीसमर्थ राऊळ महाराजांनी स्वतःच्या कृपेचे सुदर्शन चक्र माझ्या पाठीशी ठेवून माझ्याकडून सुदाम्याची नगरी कशी उभारून घेतली; ते सर्व जण आज 'हयाचि देहि हयाचि डोळा' पहातच आहेत. पिंगुळी स्थानातील सर्व मंदिरे, सभामंडप, औदुंबर, पंढरपूर क्षेत्री उभे राहिलेले प.पू राऊळ महाराज स्मृती स्मारक मंदिर व भक्तनिवास, साटेली-भेडशी येथील प.पू.राऊळ महाराज स्मारक मंदिर अशी असंख्य बांधकामे माझ्याकडून बाबांनी करून घेतली. या सर्व बांधकामांचा आर्किटेक्ट आणि इंजिनियर हा केवळ १७ दिवस शाळेत गेलेला मीच. हे सर्व

ज्ञान मला माझ्या सद्गुरूंनीच दिले. याशिवाय विविध ठिकाणी असंख्य मंदिरांच्या कळसस्थापना, भूमीपूजन, उद्घाटने माझ्याकडून झाली आहेत. श्रीराऊळ महाराजांच्या समाधी मंदिराच्या ट्रस्टप्रमाणेच माझ्या समाधी मंदिराचासुध्दा मी वेगळा ट्रस्ट करून घेतला आहे. मी माझ्या मंदिरासाठी 'राऊळ महाराज सेवा ट्रस्ट' मधून एकही पैसा घेतला नाही. मी कोणाकडून पैसे मागून आणले नाही. पण माझ्या भक्तांनी स्वतःहून मदत केली आणि गुरूकृपेनेच सर्व पूर्ण झाले.

**या माझ्या गुरूसेवेमध्ये आणि गुरूकार्यामध्ये गुरूंच्या शक्तीबरोबरच माझ्या धर्मपत्नीची साथ माझ्यासाठी खूपच मोलाची ठरली आहे.** माझी पत्नी सौ.संगीता उर्फ बाईमा हिची राऊळबाबांवर अतिशय निष्ठावंत श्रध्दा आहे. तिने मला बाबांच्या सेवेसाठी कौटुंबिक जबाबदारीतून कधीच मुक्त केले. तिने सुरूवातीलाच मला सांगितले की, ''तुम्ही आबांची सेवा करा. मी ७० माणसांच्या कुटुंबात रहाणार.'' आमच्या लग्नानंतर गेल्या ४९ वर्षात मी आजपर्यंत फक्त २३९ दिवस घरी रहायला गेलो. परंतु ती कधीही माझ्याशी भांडली नाही की माझ्याकडे कधी कोणाची तक्रार केली नाही. ती नेहमी म्हणते ''मला गाडी, बंगला, पैसा, सोने काही नको. आबा आहेत.'' तीसुध्दा राऊळ महाराजांची तन-मन-धनाने सेवा करत आहे. ९० माणसांच्या एकत्र राऊळ कुटुंबात ती सर्वांशी मिळून मिसळून प्रेमाने रहायची. २०१८ सालामध्ये तिच्या पायाच्या दुखापतीचे निमित्त झाले आणि मी तिला मठात माझ्याबरोबर रहाण्यास आणले. तेव्हापासून ती इथे रहात आहे. पण दिवसभर शेतीच्या कामाची सवय असल्याने तिला इथे करमत नाही. काही ना काही कारण सांगून ती मठातील वेगवेगळया सेवा करण्यासाठी सतत कार्यरत असते. ती एवढी साधी आहे की महाप्रसादासाठी कितीही मोठी रांग असली तरी ती रांगेत उभी राहूनच प्रसाद घेते. 'अण्णांची बायको' म्हणून ती कधीच मोठेपणाने वावरत नाही. घरातील माणसे तसेच राऊळबाबांचे लहान-थोर भक्त अशा सर्वांशीच ती प्रेमाने व आपुलकीने वागते. तिच्या अशा निःस्वार्थ व निरपेक्ष साथीमुळेच मी राऊळबाबांची आणि भाविक भक्तांची रात्रं-दिवस अखंडपणे सेवा करू शकलो आणि बाबांचे एवढे मोठे कार्य आणि अध्यात्मिक वैभव उभे करू शकलो.

पूर्वी प.पू.राऊळ महाराजांच्या कार्याच्या निमित्ताने माझे भक्तांकडे जाणेयेणे व्हायचे. गोवा, मुंबई, पुणे तसेच कोकणातील वेंगुर्ला, मालवण, चिपळूण अशी विविध ठिकाणी माझी भ्रमंती असायची. पण प.पू.राऊळबाबांनीच प्रेरणा दिल्यामुळे २०१३ पासून आजपर्यंत मी पिंगुळी सोडून कुठेच गेलो नाही. राऊळबाबा मला कुठेच जाऊ देत नाहीत. २८ मार्च २०१७ या गुढी पाडव्यापासून १३ महिने मी पूर्ण अन्नत्याग केला होता. या काळात मी सकाळी १ ग्लास दूध व दिवसभरात ५ ग्लास गरम पाण्याव्यतिरिक्त काहीही ग्रहण केले नाही. मला डायेबिटीस असल्यामुळे १५० युनिटच्या आसपास इन्सुलिन तर औषधाच्या २५ गोळया काहीही न खाता पिता दिवसाला घेत होतो. तरीही एवढया दिवसात मला काहीच त्रास झाला नाही. त्या काळात माझी तब्येत एवढी चांगली राहिली की मी एकटा, काठी न घेताही चालू शकायचो. मला अशक्तपणा किंवा थकवा आला नाही. त्याच काळात साटेली-भेडशीचा

पहिला वर्धापन दिन सोहळा जवळ आलेला असताना मला हार्ट अ‍ॅटॅक येऊन गेला. गोव्यामधील माझे परमभक्त डॉ.चोडणकर यांच्या हॉस्पिटलमध्ये केलेल्या माझ्या चाचण्यांचे रिपोर्टस् गंभीर स्वरूपाचे असल्याने माझी अँजिओग्राफी करण्याचे निश्चित झाले. त्यासाठी काही भक्त मला मुंबईला मोठया हॉस्पिटलमध्ये नेण्याचा आग्रह करू लागले. परंतु मी सर्वांना स्पष्टपणे सांगितले की ''ज्या ठिकाणी गोरगरीब माणूस उपचार घेतो अशा ठिकाणीच मी येईन.'' त्यामुळे गोव्यामधील 'गोवा मेडिकल हॉस्पिटल' या सरकारी हॉस्पिटलमध्ये मला अ‍ॅडमिट करण्यात आले व डॉ.मंजुनाथ देसाई या निष्णात हृदयरोगतज्ञाने माझी अँजिओग्राफी व त्यानंतर अ‍ॅजिओप्लास्टी केली. याचा खर्च फक्त ५० रूपये आला. राऊळ महाराज माझ्या पाठीशी होते. त्यामुळे अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टी झाल्यानंतर, डॉक्टरांच्या विश्रांती घेण्याच्या सल्ल्याला न जुमानता, १८ तासांच्या आत मी साटेली-भेडशीच्या कार्यक्रमाला तितक्याच उत्साहाने हजर झालो. मी हॉस्पिटलमध्ये सिरियस होतो, ही बातमी कळल्यामुळे तिथे भक्तांची अफाट गर्दी झाली होती. मी मात्र माझ्या आजाराची कसलीही तमा न बाळगता त्या गर्दीमध्ये सहजपणे फिरत होतो. लोकांना जवळ घेत होतो. त्यांच्याशी नेहमीप्रमाणेच बोलत होतो. ज्या हातातून ३ स्टेन्टस् टाकल्या होत्या, त्याच उजव्या हाताने मी नेहमीप्रमाणेच सर्वांना काठीचा प्रसाद देत होतो. त्याच हाताने स्टेजवरील सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये कलाकारांवर नेहमीच्याच उत्साहाने पैसे उधळत होतो. जिथे स्पीकर्सचा खूप मोठा आवाज होत होता, जो कुठल्याही पेशंटसाठी योग्य नाही; तिथेच खूप वेळ बसून मी कार्यक्रम पहात होतो. श्रीसमर्थ राऊळबाबांच्या कृपेने मला कसलाही त्रास झाला नाही. माझा हात जरी दुखत होता तरी, माझ्यावरील प्रेमाखातर तिथे आलेल्या कळकळीच्या भक्तांना पाहून, मी माझे सर्व दुखणे विसरून गेलो होतो. तीनही दिवस दुपारी १२ ते रात्री १२ वाजेपर्यंत मी या कार्यक्रमाला हजर होतो. कार्यक्रम संपल्यानंतर रात्री १ वाजता जेव्हा पिंगुळीला येऊन पोहोचलो तेव्हा मुंबईतील अनेक भक्तमंडळी माझ्याबरोबर होती. गाडीतून उतरल्यानंतर ऑपरेशन झालेले असतानाही जिने चढून मी चालत वर माझ्या खोलीत गेलो. मला कसलाही त्रास झाला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणेच उठून, आंघोळ करून मी नियोजित समाधी मंदिरात येऊन बसलो. निष्ठापूर्ण श्रध्दा असेल, तर गुरूकृपा कशी होऊ शकते, याची ही जीवंत अनुभूती आहे.

माझा ७५ वर्षाचा जीवनप्रवास हा माझे सद्‌गुरू राऊळबाबांनीच आजपर्यंत करवून घेतला व त्यांच्याच इच्छेप्रमाणे व आज्ञेप्रमाणे पुढेही चालूच रहाणार आहे. गुरूंनी मला खूप दिले. त्यांनी माझ्याकडून खूप करूनही घेतले. माझ्या आई-वडिलांच्या पूर्वपुण्याईमुळे मला पहिल्यापासूनच माझे गुरू राऊळबाबा यांनी योग्य बुध्दी दिली. मी नेहमी सर्वांना सांगत असतो की, ''आई-वडील हे पहिले गुरू आहेत. त्यांची सेवा करा.'' मी शिक्षण घेतले नाही. माझी पदवी 'झाडूवाला' वयाच्या १५व्या वर्षापासून आज ७५ वर्षापर्यंत ६० वर्षे अखंडपणे गुरूसेवा करण्याचे व्रत माझ्या गुरूमाऊलीने माझ्याकडून पूर्ण करून घेतले. काही मिळणार म्हणून मी सेवा केली नाही; तर निःस्वार्थ भावाने ही सेवा केली. त्यामुळे त्यांनी मला सर्व भरभरून दिले. शेकडो नाही, हजारो नाही, तर लाखो माणसांची सेवा माझ्याकडून घडली. ही

सेवा करण्याची संधी मला गुरूकृपेने मिळाली, हे मी माझे फार मोठे भाग्य समजतो. आज मी तृप्त आणि प्रसन्न आहे. माझे जीवन कारणी लागले, असे मला वाटते. अवघेचि त्रैलोक्य आनंदचि आता । चरणी राऊळनाथा चित्त ठेले । अशाप्रकारे माझ्या आत्म–मन–बुध्दीशरीरामध्ये आनंदच ओसंडून वहातो आहे. माझ्या या जीवन–कार्यातून कोणीतरी काहीतरी बोध घ्यावा व कोणाला तरी जीवनात चांगला मार्ग मिळावा, एवढीच हे सर्व सांगण्यामागे माझी भावना आहे. महाश्रध्देने मी स्थापिलेल्या श्रीदेव गौरीशंकर मंदिराचा २५ वा म्हणजेच रौप्य महोत्सवी वर्धापन दिन आणि माझा हा ७५वा म्हणेज अमृतमहोत्सवी वाढदिवस ११, १२, १३ व १४ मार्च या चार दिवसांमध्ये माझे भक्त मोठया उत्साहाने व थाटात साजरा करत आहेत. ज्यांना शक्य आहे त्यांनी आवर्जून या उत्सवाचा व अखंड महाप्रसादाचा लाभ घ्यावा. काही कारणास्तव कोणी येऊ शकले नाही, तरी माझा कोणावरही राग असणार नाही. आहात तिथूनच बाबांना मनोभावे नमस्कार करा. प.पू.श्रीसमर्थ राऊळ महाराजांचे अखंड आशीर्वाद तुम्हां सर्वांच्या पाठी राहोत, हीच बाबांच्या चरणी माझी प्रार्थना!!

**पंचप्राण माझे राऊळ चरणी । नाही मज लागी दुजा कोणी ।**
**अखंडित सेवा तूचि घडविली । सद्‌गुरू झालो मी तुझा ऋणी ।।**

**श्री परमपूज्य सद्‌गुरू समर्थ राऊळ महाराज की जय !**

आपला सर्वांचा झाडूवाला,

**विनायक (अण्णा) राऊळ**





## मार्च २०१९ ते फेब्रुवारी २०२०

### प.पू.विनायक अण्णा महाराज यांच्या ७५व्या म्हणजेच अमृतमहोत्सवी वर्षाप्रित्यर्थ वर्षभर राबविण्यात आलेले सामाजिक, अध्यात्मिक, शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक उपक्रम

१) **१३ मार्च २०१९ :** २० महिला व पुरूष यांना जयपूर कृत्रिम फूटचे वाटप करण्यात आले. जनकल्याण रूग्णोपयोगी साहित्य सेवा केंद्र कुडाळ यांचे सहकार्य लाभले.

२) **१३ मार्च २०१९ :** महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात ६५० लाभार्थ्यांनी लाभ घेतला. तसेच मोफत चष्मा वाटप करण्यात आले. (राणी जानकीबाई वैद्यकीय संस्था सावंतवाडी यांचे सहकार्य लाभले.)

३) **जून-जुलै २०१९ :** सिंधुदूर्ग जिल्ह्यातील संपूर्ण ८ तालुक्यामधील गरजवंत अशा एकूण ७५ शाळांमध्ये १३००० वह्यांचे वाटप करण्यात आले. यास ॲड. संजोग परब, सातेरी फाऊंडेशन सरंबळ यांचे सहकार्य लाभले. तसेच १३०० शालेय दप्तराचे वाटप करण्यामध्ये श्री. अशोक कदम, सौ. श्रध्दा खामकर, श्री. महादेव पांगे, डॉ. श्री. विनय पाटील. श्री. राजेंद्र वखरे, श्री. सुवर्णाजी आमोणकर, श्री. अरविंद कदम यांचे सहकार्य लाभले.

**ऑगस्ट २०१९ :**

४) पिंगुळीतील सर्व शाळा व अंगणवाडी यांना १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्तांने जिलेबी वाटप करण्यात आले.

५) २८ जुलै २०१९ रोजी दादर, मुंबई येथील सूर्यवंशी हॉलमध्ये श्री. राऊळ महाराज व प. पू. अण्णा महाराज यांच्या **'पादुकाचा पूजन सोहळा'** भक्तगणांतर्फे आयोजित केला होता. त्यावेळी महाराष्ट्र एकता अभियानचे मिलिंद तुळसकर व चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने तसेच महावीर इंटरनॅशनल ट्रस्ट यांच्या सौजन्याने मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी नामांकित डॉक्टरांचे सहकार्य लाभले, तर या शिबिराचा लाभ असंख्य भाविकांनी घेतला.

६) कोल्हापूर पूरग्रस्तांना रू. १,५०,०००/- ची आर्थिक मदत राऊळ महाराज ट्रस्ट व चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने करण्यात आली. तर यापूर्वी केरळ पूरग्रस्तांना रू. २ लाख ५० हजाराचे आर्थिक सहाय्य करण्यात आले.

**सप्टेंबर २०१९ :**

७) १३००० नारळ झाडांचे वाटप पिंगुळीतील सर्व ७५ महिला बचत गट व जिल्ह्यातील काही प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना करण्यात आले.

८) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मार्च २०१८–१९ मध्ये इयत्ता दहावीमध्ये प्रथमत: उत्तीर्ण झालेल्या ७५ विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. नोटबुक, कंपास बॉक्स, परिक्षा पॅड, शॉल व रूपये ५००/– देऊन हा सत्कार करण्यात आला. वरील शैक्षणिक साहित्यासाठी श्री व सौ. स्वाती लक्ष्मण वालावलकर रा. मुंबई याचे सहकार्य लाभले.

**ऑक्टोबर २०१९ :**

९) २ ऑक्टोबर गांधी जयंतीदिनी पिंगुळी येथे स्वच्छता अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या स्वच्छता अभियान उपक्रमांतर्गत पंढरपूर येथे चंद्रभागेच्या काठावर सुमारे ५०० भक्तगणांच्यावतीने स्वच्छता अभियान चालविण्यात आले. तसेच पिंगुळी नजिकच्या पाट, मांडकुली, वाडीवरवडे, भोयाचे केरवडे, बिबवणे, साळगाव तसेच पिंगुळी, टेंबधुरीनगर, गोंधळपूर, देऊळवाडी, गुढीपूर, शेटकरवाडी, आसनाचे पाणी, अशा एकूण १३ गावांमध्ये स्वच्छता अभियान उपक्रम राबवण्यात आला. त्याचप्रमाणे १३ बंधारेही बांधण्यात आले.

**७५ नामस्मरण सोहळे :**

१०) या अमृतमहोत्सवी वर्षात ७५ नामस्मरणांच्या संकल्पाचे आयोजन मुंबई येथील सौ. श्रध्दा विकास खामकर व भक्तपरिवार यांचेतर्फे मुंबई, गोवा, पुणे, चिपळूण व सिंधुदूर्ग या ठिकाणी करण्यात आले. त्यातील ५० वा नामस्मरण सोहळा पंढरपूर येथील श्री. राऊळ महाराजांचे स्मारक मंदिर व भक्तनिवास पंढरपूर सांगोला रोड येथे संपन्न झाला, तर ७५ वा नामस्मरण सोहळा १३ ऑक्टोबर २०१९ रोजी कोजागिरी पौर्णिमेदिवशी प. पू. राऊळ महाराजाच्या ११५ वा जयंती उत्सवानिमित्ताने पिंगुळी येथे संपन्न झाला.

**नोव्हेंबर २०१९ : (१ ते ३ नोव्हेंबर तिसरा वर्धापन दिन सोहळा)**

११) श्री. प. पू. राऊळ महाराजांचे तिसरे स्मारक मंदिर साटेली–भेडशी दोडामार्ग येथे आहे. या ठिकाणी महाआरोग्य शिबीर व रक्तदान शिबीर आयोजित केले. या शिबीरामध्ये पर्वरी, गोवा येथील 'चोडणकर नर्सिंग होम'चे डॉ. रविंद्र चोडणकर व त्यांचे सहकारी तसेच राणी जानकीबाई वैद्यकिय संस्था सावंतवाडी येथील एकूण २५ सहकारी डॉक्टर सहभागी होते. या शिबीराचा ६०० रूग्णांनी लाभ घेतला व मोफत रक्तदानालाही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभला.

**रविवार दि. २५ नोव्हेंबर २०१९ :**

१२) कोकणचे सिंधुदूर्ग महाचॅनल सिटी ऑन सायकल २०१९ च्या उपक्रमास मा. श्री. प. पू. अण्णा महाराज साळगाव महाविद्यालयाच्या ७५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रूपये ३०० प्रमाणे एकूण रूपये २२,५०० ची रक्कम अदा करण्यात आली.

**गुरूवार दि. २८ नोव्हेंबर २०१९ :**

१३) सकाळी ११.०० वाजता सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजने अंतर्गत सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ८ ही तालुक्यामधून ८३ लाभार्थ्यांची निवड करण्यात येऊन त्यांचेसाठी प्रत्येकी रूपये ३००० या प्रमाणे रूपये २,४९००० चा धनादेश मा. शिक्षणाधिकारी श्री. आमोकर जि. प. सिंधुदूर्ग यांच्याकडे चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने सुपूर्द करण्यात आला.

**११ डिसेंबर २०१९ (दत्तजयंती) :**

१४) पिंगुळीतील सर्व महिला तसेच उपस्थित असलेल्या सर्व महिलांकरिता 'सांस्कृतिक व क्रीडा' उपक्रमांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**१२ डिसेंबर २०१९ :**

१५) प. पू. राऊळ महाराज समाधी मंदिर पिंगुळी येथे महारक्तदान शिबीर (७५ रक्तदाते) संपन्न करण्यात आले.

**जानेवारी २०२० :**

१६) **मतिमंद शाळांना आर्थिक मदत देण्यात आली.**

**अ) माऊली महिला मंडळ, शिरोडा संचलित**

१) कर्णबधीर निवासी विद्यालय, शिरोडा वेंगुर्ले
२) माऊली मतिमंद निवासी विद्यालय, कोंडुरा सावंतवाडी
ब) सांगली मिशन सोसायटी संचलित
३) जीवदान मतिमंद विशेष शाळा, झाराप, कुडाळ

**क) तांबे एज्युकेशन सोसायटी मुंबई संचलित**

४) राजश्री छत्रपती शाहू महाराज मतिमंद निवासी विद्यालय, करंजे, कणकवली
५) कै. माधवराव खाजनवाडकर मतिमंद मुलांची निवासी शाळा, कोटकामते लिंगडाळ, देवगड

१७) **अनाथ आश्रमांना जीवनावश्यक वस्तुंचे वाटप :**

६) सुरेश बिर्जे चॅरिटेबल ट्रस्ट अनाथ आश्रम, माड्याचीवाडी, कुडाळ
७) सविता आश्रम पणदूर
८) जीवन संजीवनी सेवा ट्रस्ट आनंद आश्रय अणाव

**२७ जानेवारी ते २९ जानेवारी २०२० :**

१८) **कीर्तन महोत्सव :**

**ह.भ.प.श्री. हरिहर नातू बुवा**, पुणे
**ह.भ.प.सौ. स्मिता आंजेगावकर**, मुंबई
**ह.भ.प.श्री. चारूदत्त आफळे बुवा** (राष्ट्रीय कीर्तनकार), पुणे

**३० जानेवारी २०२० :**

१९) वैद्य. श्री. सुविनय विनायक दामले–कुडाळ, सिंधुदुर्ग यांचे 'अध्यात्मिक आरोग्य' या विषयावर दृकश्राव्य माध्यमाद्वारे व्याख्यान

**फेब्रुवारी २०२० :**

**२३ फेब्रुवारी २०२० ते २८ फेब्रुवारी २०२० :**

२०) दशावतारी नाट्य महोत्सव : असा सहा दिवसांचा जिल्ह्यातील नामवंत दशावतारी नाट्य मंडळांचा नाट्यमहोत्सव

२१) जिल्हास्तरीय पुरूष व महिला कबड्डी स्पर्धा संपन्न संपूर्ण अमृतमहोत्सवी वर्षांत जिल्ह्यामध्ये आरोग्य उपक्रमांतर्गत गरजवंताना आर्थिक मदत करण्यात आली.






# प.पू.सद्गुरू समर्थ अण्णा महाराज यांच्या ७५ व्या म्हणेजच अमृतमहोत्सवी वाढदिवसाची रुपरेषा

**प.पू.सद्गुरु समर्थ विनायक अण्णा महाराज यांचा ७५वा म्हणजेच 'अमृतमहोत्सवी वाढदिवस' दिनांक १३ मार्च २०२०** या दिवशी सर्व भक्तजनांतर्फे अतिशय थाटात संपन्न होणार आहे. त्याप्रित्यर्थ, **बुधवार, दि. ११ मार्च २०२० ते शनिवार दि. १४ मार्च २०२०** या चारही दिवशी **धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य विषयक** असे विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत. डोळयांचे पारणे फिटवणाऱ्या या सोहळयाला सर्वांनी सहकुटुंब-सहपरिवार आवर्जून उपस्थित राहून या सोहळयाचा आनंद लुटावा व सद्गुरूंच्या आशीर्वादाचा लाभ घ्यावा, ही विनंती.

## बुधवार, दि. ११ मार्च २०२०

**कार्यक्रमाची सुरूवात चारही दिवशी पहाटे ५.३० वा. काकड आरतीने होईल.**

| | | |
|---|---|---|
| सकाळी ७ वा. | : | **प.पू.स.स. राऊळ महाराज समाधी पूजन व समाधीकडील अभिषेक** |
| सकाळी ८ ते १२ वा. | : | **ऐंद्री (७५) शांती धार्मिक विधी, प्रायश्चित विधान, विष्णू सहस्त्रनाम जप, गाऱ्हाणे, गणपती पूजन, पुण्याहवाचन, नांदीश्राध्द, आचार्यवरण, प्राकार शुद्धी, देवता स्थापना, देवता जप, मृत्युंजय जप, तीर्थप्रसाद** |
| दुपारी १२ वा. | : | **श्रींची आरती** |
| दु. १ ते सायं.६:३० वा. | : | **सांस्कृतिक कार्यक्रम** |
| सायंकाळी ७ वा. | : | **सांजआरती** |
| रात्रौ ९ वा. | : | **आर्ट इन मोशन,** नृत्याविष्कार सादरकर्ते **– सौ. श्रध्दा नेरुरकर** |

## गुरूवार, दि. १२ मार्च २०२०

| | | |
|---|---|---|
| सकाळी ७ वा. | : | प.पू.स.स. राऊळ महाराज समाधी पूजन व समाधीकडील अभिषेक |
| सकाळी ८ ते १२ वा. | : | शांतीपाठ, स्थापित देवतांचे पूजन, अग्निस्थापना, ग्रहस्थापन, ग्रहयज्ञ, प्रधान होम, बलिदान, पूर्णाहुती, अभिषेक, ब्राम्हण संभावना, प्रार्थना. |
| सकाळी ९ ते ११ वा. | : | प.पू.स.स. राऊळ महाराज पालखी व उत्सवमूर्ती प.पू.स.स. विनायक अण्णा महाराजांचा सपत्नीक रथ मिरवणूक सोहळा, (प.पू.स.स. राऊळ महाराज समाधीस्थान ते पिंगुळी ग्रामदैवत श्री देव रवळनाथ मंदिर ते प.पू.राऊळ महाराज व प.पू.अण्णा महाराज यांचे जन्मस्थान आणि पुन्हा प.पू.स.स. राऊळ महाराज समाधी स्थानी आगमन). |
| | | प.पू.स.स.राऊळ महाराज भक्त मंडळ आजरा पंचक्रोशी यांचे पायी दिंडी आगमन सौजन्य – सुभाष उर्फ आबा नलावडे |
| दु. १२ वा. | : | श्रींची आरती |
| दु. १ ते रात्रौ १२ वा. | : | अखंड महाप्रसाद |
| दु. १:३० वा. | : | जनता सेवा मंडळ प्रा. भ. मंडळ, परबवाडा वेंगुर्ला, श्री. सहदेव परब |
| दु. ३ ते सायं.५:३० वा. | : | सांस्कृतिक कार्यक्रम |
| सायं. ५:३० वा. | : | प.पू.स.स. राऊळ महाराज भजन मंडळ, पिंगुळी यांचे सुश्राव्य भजन |
| सायं. ७ वा. | : | सांजआरती |
| | | हनुमान दामोदर प्रा. भजन मंडळ श्री.प.पू.स.स. राऊळ महाराज भक्तमंडळ साटेली भेडशी |
| रात्रौ ८:३०ते११:३० वा. | : | प.पू.सद्गुरू समर्थ राऊळ महाराज आणि प.पू.सद्गुरू समर्थ अण्णा महाराज या अध्यात्मिक गुरू – शिष्याच्या प्रगल्भ |

जीवनचरित्रावर आधारित एक अंकी नाटक

**अनाथांचे नाथ - पिंगुळीचे श्री राऊळनाथ :**

संकल्पना व लेखन - सौ. श्रद्धा विकास खामकर

रिसर्च व दिग्दर्शन - श्री. नंदू आचरेकर,

नेपथ्य रचना - श्री. बाबा पार्सेकर, गीत रचना -

प्रसिध्द गीतकार श्री. गुरू ठाकूर व सौ. श्रध्दा खामकर,

गायीका - सौ. पूजा अक्षय सावंत खामकर

प.पू. सद्‌गुरू समर्थ अण्णा महाराजांच्या भूमिकेत -

श्री. चिन्मय खामकर आणि 'स्वामी समर्थ मालिका फेम'

श्री. प्रफुल्ल सामंत निमिर्ती - श्री. विकास खामकर कृत

श्री समर्थ राऊळ महाराज कला साधना

---

रात्रौ १२:०१ वा. : हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत प.पू.स.स. विनायक अण्णा महाराज यांचा ७५वा अमृतमहोत्सवी वाढदिवस सोहळा ढोलवाद्यांच्या गजरात

(सौजन्य : रणरागिणी महिला ढोलपथक, वालावल)

## शुक्रवार, दि. १३ मार्च २०२०

सकाळी ७ वा. : प.पू.स.स. राऊळ महाराज समाधी पूजन व समाधीकडील अभिषेक

---

सकाळी ८ ते ११ वा. : गौरी-शंकर मंदिराच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त लघुरूद्र

---

सकाळी ८ ते ९ वा. : 'श्रीगुरुकूळदिंडी' - प.पू.स.स. राऊळ महाराज यांच्या परिवारातील लहान-थोर सदस्यांतर्फे प.पू.अण्णा महाराजांना भाव-वंदना. संकल्पना : सौ. सुनंदा अशोक पवार

---

स. ९ ते १० वा. : प.पू.स.स. अण्णा महाराज यांची शास्त्रोक्त मंत्रोच्याराने सपत्नीक पाद्यपूजा

---

स. १० ते १२ वा. : प.पू.स.स. अण्णा महाराज यांचा शास्त्रोक्त मंत्रोच्याराने सपत्नीक तुलाभार सोहळा

टीप : प.पू.अण्णा महाराज यांच्या ७५ व्या 'न भूतो न भविष्यति' अशा अमृतमहोत्सवी वाढदिवसाप्रित्यर्थ संपन्न होत असलेली प.पू. अण्णा महाराज यांची पाद्यपुजा व तुलाभार सोहळा हा या संपूर्ण कार्यक्रमातील अत्यंत महत्वाचा व हृदयंगम सोहळा असणार आहे. तरी भाविक भक्तांनी या महत्वाच्या सोहळ्याला अधिकाधिक संख्येने उपस्थित राहून याचा आवर्जून लाभ घ्यावा.

---

दु. १२ वा. : अनुभूतींचे दिव्यामृत

(प.पू.राऊळ महाराज आणि प.पू.अण्णा महाराज महाराज यांचे भक्तांना आलेले दिव्य अनुभव)

संकलन – डॉ.सौ.सुजाता विनय पाटील, सौ. निहारिका महादेव पांगे, सौ. श्रद्धा विकास खामकर

माझ्या जीवनातील प.पू. बाबा अण्णांचे लीलादर्शन –
लेखिका : सौ. प्रगती प्रमोद तेंडोलकर

प.पू. राऊळबाबा – अण्णांच्या आशीर्वादाच्या छायेत –
लेखिका – सौ. रेखा बाळकृष्ण लोके

सद्‌गुरू समर्थ राऊळबाबा – प.पू.अण्णा महाराज अमृतमहोत्सव विशेषांक : संपादक – बाळ कालेकर

---

प.पू. विनायक अण्णा महाराज चॅरिटेबल ट्रस्ट व जनकल्याण रुग्णोपयोगी सेवा साहित्य केंद्र कुडाळ आयोजित कृत्रिम जयपूर फूट वाटप

---

दु. १२:३० वा. : श्रींची आरती

---

दु. १ ते रात्रौ १२ वा. : अखंड महाप्रसाद

---

दु. १ ते २ वा. : ह.भ.प. श्री. नाईकबुवा, वेतोरे यांचे सुश्राव्य कीर्तन

---

दु. २ ते ४ वा. : देश विदेशात गाजलेल्या प्रख्यात गायिका सौ. कविता देशपांडे यांचा सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम,

सहकारी : श्री. संजय परळकर, कु. आर्या शहा व इतर

---

दु. ४ ते ५ वा. : श्री रामसेवा संघ बांबुर्डे मयडे, बार्देश गोवा प्रस्तुत –

दीनांची माऊली

(भक्तीगीत, अभंग, भावगीत, नाट्यगीत आणि लावणी)

| | | |
|---|---|---|
| सायं.५:३० ते ६:३० वा. | : | **तबलावादन जुगलबंदी : सादरकर्ते – कौस्तुभ चारी, विनय पेडणेकर व मिहिर पेडणेकर** |
| सायं. ७ वा. | : | **सांजआरती** |
| सायं. ७ ते ८ वा. | : | **दत्तगुरू प्रा.भजन मंडळ कासार्डे कणकवली–श्री. प्रकाश पारकर** |
| रात्रौ ८ ते ९:३० वा. | : | **राऊळनगरीनृत्यनाटिका प.पू. अण्णा महाराजांनी सतत आपल्या भक्तांना भरभरुन दिले आहे. या कार्यक्रमाद्वारे आपण भक्त त्यांच्याप्रति असलेली कृतज्ञता व्यक्त करत आहोत, एक काल्पनिक राऊळनगरी उभारुन. त्यासाठी सर्व भक्तांनी प्रेक्षणीय श्रवणीय अशा नाटिकेसाठी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून प.पू. अण्णा महाराजांना मानवंदना अर्पण करायची आहे. संकल्पना व लेखनासाठी निमित्त केवळ सौ. निहारिका पांगे. सादरकर्ते – प.पू.राऊळ महाराज भक्तमंडळ, मुंबई.** |
| रात्रौ १० वा. नंतर | : | **पिंगुळी स्थानी आकर्षक दिंड्यांचे आगमन<br>१) भाग्योदय मित्र मंडळ, गांगोची राई कसाल<br>२) साई कला क्रिडा मंडळ, कुंभारवाडी कसाल – श्री. नवीन बांदेकर** |
| रात्रौ ९:३०ते११:३०वा. | : | **भरत नृत्यार्चना. प्रसिध्द मराठी भक्ती रचनांना दक्षिण भारतीय शास्त्रीय नृत्याची जोड. भारताच्या विविध मंदिरात व अध्यात्मिक संस्थांमध्ये उदंड प्रतिसाद लाभलेली रस–भाव–भक्तीने नटलेली, नर्तनरुपी कीर्तनसेवा. सादरकर्ते – श्री. अक्षय आयरे व शिष्य परिवार, मुंबई . हा कार्यक्रम अतिशय नेत्रदीपक असा असल्यामुळे रसिक भक्तांनी याचा रसास्वाद जरुर घ्यावा.** |

## शनिवार, दि. १४ मार्च २०२०

| | | |
|---|---|---|
| सकाळी ७ वा. | : | **प.पू.स.स. राऊळ महाराज समाधी पूजन व समाधीकडील अभिषेक** |
| दुपारी १२:३० वा. | : | **श्रींची आरती** |
| दु. १ ते रात्रौ १२ वा. | : | **अखंड महाप्रसाद** |
| दुपारी २ ते ३ वा. | : | **प.पू. राऊळमहाराज यांच्या कुटुंबातील महिला भजन मंडळ यांचे सुश्राव्य भजन.** |

| | | |
|---|---|---|
| दुपारी ३ ते ४:३० वा. | : | **प.पू. भालचंद्र महाराज प्रा. भ. मंडळ – जानवली कणकवली** **श्री. शशिकांत राणे** |
| सायं. ४:३० वा. | : | **गीत राऊळायण. गीत रामायणाच्या धर्तीवर आधारित प.पू. अण्णा महाराजांचे संक्षिप्त जीवनचरित्र गीतांद्वारे उलगडण्याचा अल्प प्रयत्न. लेखन व निवेदन : सौ. निहारिका पांगे. गायक कलाकार : हेत्वी सेठिया, सिध्दांत पाटकर, तेजस्विनी सोनावडेकर, कौस्तुभ गावडे व रश्मी वालावलकर** |
| सायं. ७ वा. | : | **सांजआरती** |
| सायं. ७ ते ९ वा. | : | **प.पू. राऊळ महाराज भक्त मंडळ यांचा नृत्य आविष्काराचा कार्यक्रम. कु. आयुषी व कु. गायत्री कोठावळे कु. श्रावणी कुडकर व इतर भक्त** |
| रात्रौ ९ ते १२ वा. | : | **शिमगोत्सव सोहळा सादरकर्ते :** **श्री. दिनू मेस्त्री व सहकारी – नेरुर मेस्त्रीवाडा** **श्री. बाबा मेस्त्री व सहकारी – नेरुर मेस्त्रीवाडा** |

विश्वस्त

**प. पू. सद्गुरू समर्थ राऊळ महाराज सेवा ट्रस्ट, पिंगुळी**

विश्वस्त

**श्री. प. पू. स. स. विनायक (अण्णा) राऊळ महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, पिंगुळी**

कार्यक्रमामध्ये 'बदल' करण्याचे सर्वाधिकार **प.पू. अण्णा महाराज** यांच्याकडे राहतील.

या संपूर्ण **कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण प.पू. अण्णा महाराजांचे** परम भक्त, **माननीय श्री. सुवर्णाजी आमोणकर**, यांच्या सौजन्याने youtube/sonalicablevision या वेबसाईटवर सर्वांसाठी उपलब्ध असेल. त्याचा भाविकांनी अवश्य लाभ घ्यावा.

**प.पू. अण्णा महाराज यांच्या अमृतमहोत्सवी सोहळ्यातील आकर्षक विद्युत रोषणाई व उत्सव मंडप – श्री. महेश राऊळ** यांच्या **सौजन्याने**

**संपूर्ण सोहळ्यातील फुलांची आकर्षक सजावट – श्री. अजित आंगणे, ॲड. श्री. सूरज कुडाळकर** आणि मित्र परिवार यांच्या सौजन्याने




प.पू. सद्गुरु समर्थ अण्णा राऊळ महाराज
(पिंगुळी) अमृतमहोत्सवी सोहळा (कुडाळ)